*Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies,*
*Online ISSN 2278-8808, SJIF 2018 = 6.371, www.srjis.com*
*PEER REVIEWED JOURNAL, JULY-AUG, 2018, VOL- 6/46*

# शालेय पोषण आहार योजनेतील आमुलाग्र बदल – चिकित्सक अभ्यास

**डॉ अरुणा राजाराम भांबरे**
प्रभारी प्राचार्य श्री समर्थ कॉलेज ऑफ एज्युकेशन अँड रिसर्च ( बी.एड ) म्हसणे फाटा पारनेर अहमदनगर.

**Abstract**

*शालेय पोषण आहार योजना ही शिक्षणक्षेत्रातील महत्वपूर्ण केंद्र पुरस्कृत योजना असून राज्यात सदर योजना **22** नोव्हेंबर **1995** पासून राबविण्यात येत आहे . भारत सरकारव्दारे केंद्राने सुरूवातीला या योजनेअंतर्गत इयत्ता **1** ली ते **5** वी च्या विद्यार्थ्यांना प्रति महिना **3** किलो प्रमाणे मोफत तांदूळ देण्यात येत होता . सन **2001** मध्ये सर्वोच्च न्यायालयाने शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांना कोरडा तांदूळ न देता शाळेमध्ये शिजवून द्यावे असे आदेश दिले व त्यानुसार सन **2002** पासून शालेय पोषण आहार योजनेचे स्वरूप बदलून घरी तांदूळ देण्याऐवजी विद्यार्थ्यांना शाळेतच शिजविलेला आहार देण्यात येतो . सन **2008** मध्ये या योजनेचा विस्तार करण्यात आला असून इयत्ता **6** वी ते **8** वीच्या विद्यार्थ्यांना सुध्दा शालेय पोषण आहार योजनेचा लाभ देण्यात येतो . प्रस्तुत संशोधन हे प्रामुख्याने शालेय पोषण आहार योजनेतील आमुलाग्र बदल – चिकित्सक अभ्यास विषयक असून यामध्ये पुढील संशोधन उदि्दष्टांचा अभ्यास केलेला आहे. उदि्दष्ट **1.** शालेय पोषण आहार योजनेतील उदि्दष्टांचा अभ्यास करणे. **2.** शालेय पोषण आहार योजनेच्या कार्यपध्दतीचा अभ्यास करणे. **3.** शालेय पोषण आहार योजनेचा चिकित्सक अभ्यास करणे. प्रस्तुत संशोधनात विविध संदर्भ स्त्रोतांचा अभ्यास केलेला असून यामध्ये संदर्भ पुस्तके, मासिके, नियतकालिके, पूर्व संशोधन कार्य यांचा आढावा घेण्यात आलेला आहे.*

***गुज शब्द:*** *शालेय पोषण आहार योजना, चिकित्सक अभ्यास*

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

**प्रस्तावना:**

वैयक्तिक जीवन घडवायचे असो किंवा राष्ट्राची जडणघडण करावयाची असो वा संस्कृतीची उभारणा करावयाची असो, त्यासाठी शिक्षण हे आवश्यकच असते . शिक्षण प्रकियेत शिक्षक, विद्यार्थी व अध्ययन – अध्यापन हे तीन महत्वाचे पैलू आहेत. शिक्षणातूनच व्यक्तीचा सर्वांगीण विकास घडविण्याचे कार्य केले जाते, म्हणूनच "शिक्षण म्हणजे सर्वांग सुंदर जीवन जगण्याचा मार्ग" असे स्वामी विवेकानंदांनी म्हटले आहे. शिक्षण व्यक्तीला व समाजाला दिशा देण्याचे कार्य करते . राष्ट्रनिर्मितीसाठी शिक्षण हा महत्वाचा केंद्रबिंदू आहे. भारतीय राज्यघटनेच्या **45** व्या कलमानुसार भारतात सार्वत्रिक शिक्षणाचा प्रसार झपाटयाने होत आहे. आपल्या भारतीय शिक्षण पध्दतीत शैक्षणिक उपस्थिती हा अविभाज्य घटक आहे . कारण शैक्षणिक उपस्थितीदवारे विद्यार्थ्यांच्या शालेय संपादनाची कल्पना येत असते, अशा प्रकारे शिक्षण पध्दतीत एका गोष्टीवर दुसरी बाव अवलंबून असते. याचाच अभ्यास करून केंद्र सरकारने राज्याच्या सहकार्यांनी विविध शैक्षणिक योजना आमलात आणल्या आहेत . यातीलच एक महत्वपूर्ण योजना म्हणजे शालेय पोषण आहार योजना होय .

संशोधकाने प्रस्तुत विषयानुसार खालील संशोधन उदि्दष्टांचा अभ्यास केलेला आहे .

**प्रस्तुत संशोधनाची उदि्दष्टे:**

1. शालेय पोषण आहार योजनेतील उदिदष्टांचा अभ्यास करणे.
2. शालेय पोषण आहार योजनेच्या कार्यपध्दतीचा अभ्यास करणे.
3. शालेय पोषण आहार योजनेचा चिकित्सक अभ्यास करणे.


**शालेय पोषण आहार योजना:**

शालेय पोषण आहार योजना ही शिक्षणक्षेत्रातील महत्वपूर्ण केंद्र पुरस्कृत योजना असून राज्यात सदर योजना 22 नोव्हेंबर 1995 पासून राबविण्यात येत आहे. सन 2008 मध्ये या योजनेचा विस्तार करण्यात आला असून इयत्ता 6 वी ते 8 वीच्या विद्यार्थ्यांना सुध्दा शालेय पोषण आहार योजनेचा लाभ देण्यात येतो .

शिक्षण प्रकियेत विद्यार्थी हा महत्वाचा घटक आहे . थोडक्यात शिक्षणातून व्यक्ती विकास व समाज विकास घडवित असताना विद्यार्थी केंद्रबिंदू मानून शासनाने काही योजना राबविल्या आहेत यातीलच एक योजना म्हणजे शालेय पोषण आहार योजना होय.

**शालेय पोषण आहार योजनेची उदि्दष्टे:** केंद्र व राज्य शासनाच्या, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या, खाजगी अनुदानित व अंशत अनुदानित शाळा, मदरसा व राष्ट्रीय बालकामगार शाळेतील विद्यार्थी इ . ठिकाणी शिक्षण घेणा-या इयत्ता 1 ली ते 8 वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहार योजनेचा लाभ दिला जातो .

**शालेय पोषण आहार योजनेची उदि्दष्टे पुढीलप्रमाणे-**




*शालेय पोषण आहार योजनेची उदि्दष्टे*

**शालेय पोषण आहार योजनेच्या अंमलबजावणीची कार्यपध्दती:**

- ✓ शालेय पोषण आहार योजनेच्या अंमलबजावणीची जबाबदारी शाळा व्यवस्थापन समितीवर सोपविण्यात आली आहे .
- ✓ खाजगी शाळांबावत संबंधित शाळा व्यवस्थापनाकडून शालेय पोषण आहार योजनेची अंमलबजावणी केली जाते .
- ✓ शालेय पोषण आहार योजने अंतर्गत आहार शिजविण्याचे काम महिला बचत गट, गरजू महिला तसेच NGO यांच्याकडून केले जाते .
- ✓ शालेय पोषण आहार योजनेच्या अंमलबजावणीसाठी लागणारा तांदूळ केंद्र शासनाकडून मोफत प्राप्त होतो .
- ✓ शालेय पोषण आहार योजनेच्या अंतर्गत भारतीय अन्न महामंडळाच्या गोडाऊनमधून प्राप्त होणा-या तांदूळाची शाळेपर्यंत वाहतूक करण्यासाठी केंद्र शासनाकडून वाहतूक खर्च प्राप्त होतो .
- ✓ केंद्र शासनाकडून मिळणा-या मोफत तांदुळापासून आहार बनविण्याकरिता Cooking Cost या शिर्षाखाली शासनाकडून अनुदान प्राप्त होते . Cooking Cost यामध्ये इतर धान्यादी वस्तू, आहार तयार करण्यासाठी लागणारे इंधन तसेच पालेभाज्या इ . खर्चाचा समावेश असतो .

**स्वयंपाकी व मदतनीस**

दिनांक **2** फेब्रुवारी **2011** च्या शासन निर्णयानुसार शालेय पोषण आहार योजनेमध्ये अन्न शिजवण्याचे काम करण्यासाठी स्वयंपाकी व मदतनीस या कामासाठी स्वतंत्रपणे मानधन अदा करण्यास मान्यता देण्यात आली आहे .

**स्वयंपाकी व मदतनीस यांनी पुढीलप्रमाणे कामे करणे आवश्यक आहे**

1. अन्न व्यवस्थित शिजविण्याचे काम करणे .
2. तांदूळ व धान्यादी मालाची काळजीपूर्वक साफसफाई करणे .
3. शाळेमध्ये विद्यार्थ्यांना आहाराचे वाटप जेवणाच्या जागेवर करणे तसेच पाणी पुरविणे .
4. भोजनानंतर जागेची ताटांची साफसफाई करणे, शाळा व परिसर स्वच्छ ठेवणे .

**शालेय पोषण आहार योजनेचा चिकित्सक अभ्यास:**

1. शिक्षण ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे . प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरणास चालना देण्यासाठी शालेय पोषण आहार योजना उपयुक्त आहे .
2. विद्यार्थ्यांची उपस्थिती व शालेय वातावरण वृध्दींगत करण्यासाठी शालेय पोषण आहार योजना फारच महत्वाची आहे .
3. विद्यार्थ्यांची बौध्दिक क्षमता व वयोगट लक्षात घेऊन त्यांच्या क्षमतेनुसार प्रत्येक स्तरावरील अभ्यासक्रमातील वेगवेगळी वाचनाची उदाहरणे अभ्यासक्रम मंडळ ठरवून देते . सहकार्यवृत्ती, शालेय अभिरूची व आंतरक्रिया वाढविण्यासाठी शालेय पोषण आहार योजना उपयुक्त आहे .
4. शैक्षणिक अध्ययन हे मनोरंजक व हवेहवेसे होणे गरजेचे आहे, यासाठीच शालेय पोषण आहार योजना उपयुक्त व नाविन्यपूर्ण असणे गरजेचे आहे .

*Copyright © 2018, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

5. विद्यार्थ्यांना शैक्षणिक बाबी अचूक आल्याने शिक्षक विद्यार्थी आंतरक्रिया वाढीस चालना मिळेल.
6. विद्यार्थ्यांच्या अध्ययनाच्या कक्षा वाढविण्यासाठी मदत होते. अध्ययनात नाविन्य, उत्तेजन, ताजेपणा निर्माण करणा-यासाठी शालेय पोषण योजना उपयुक्त परिणामकारक आहे.
7. विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रकिया वृध्दींगत होण्यास मदत होते व आत्मविश्वास आणि अभिरूची निर्माण होण्यास मदत होते.

**समारोप:**

शालेय पोषण आहार योजना ही विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासास चालना देण्यासाठी उपयुक्त आहे. शालेय विद्यार्थ्यांना योग्य वयातच मानसिक, शारीरिक, बौध्दीक व भावनिक विकासातून प्रगती साधण्यास शालेय पोषण आहार योजना महत्वाची आहे. याचाच सारासार विचार करून शिक्षण प्रकियेतील विद्यार्थी हा महत्वाचा घटक केंद्रबिंदू मानून शासनाने योजना निश्चित केलेली आहे. थोडक्यात शिक्षणातून व्यक्ती विकास व समाज विकास घडवित असताना विद्यार्थी केंद्रबिंदू मानून शासनाने काही योजना राबविल्या आहेत यातीलच एक योजना म्हणजे शालेय पोषण आहार योजना ही फारच उपयुक्त व विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासास चालना देण्यासाठी परिणामकारक आहे.

शालेय विद्यार्थ्यांची उपस्थिती वाढवून व शैक्षणिक गळती थांबवून विद्यार्थ्यांच्या अभिरूचीपूर्ण शिक्षणास संधी देण्यासाठी शालेय पोषण आहार योजना महत्वाची आहे. पोषण व स्वच्छता तसेच निटनिटकेपणा असे मूल्य रूजविण्यासाठी शालेय पोषण आहार योजना महत्वाची आहे.

**संदर्भ:**

*दांडेकर, वा. ना. (2004). **शैक्षणिक संख्याशास्त्र व मूल्यमापन**, पुणे; नित्य नूतन प्रकाशन.*

*देसले, सुनिल., भदाणे., एस. (2009). **शैक्षणिक मूल्यमापन व संख्याशास्त्र**, नाशिक, रेशमाई पब्लिकेशन.*

*देसाई, भरत., अभ्यंकर, शोभना. (2010). **प्रायोगिक मानसशास्त्र आणि संशोधन पद्धती**, पुणे; नरेंद्र प्रकाशन.*

*जगताप ह. ना, **2009 शैक्षणिक व प्रायोगिक मानसशास्त्र,** पुणे नित्यनूतन प्रकाशन.*

*कदम चा. प., **2007 शैक्षणिक संख्याशास्त्र,** पुणे नित्यनूतन प्रकाशन.*

*पंडित व. वि., **2010 शिक्षणातील संशोधन,** पुणे नित्यनूतन प्रकाशन.*

*दांडेकर वा. ना., **2004 शैक्षणिक संख्याशास्त्र व मूल्यमापान,** पुणे नित्यनूतन प्रकाशन.*

*करंदीकर सु., **2006 शैक्षणिक मानसशास्त्र** कोल्हापूर, फडके प्रकाशन.*

*भांडारकर के., **2005 सुलभ शैक्षणिक संख्याशास्त्र,** पुणे नित्यनूतन प्रकाशन.*

*महाराष्ट्र शासन 'शालेय पोषण आहार योजना' कार्यपुस्तिका*

*Best J.W & Khan J.V (2011) **Research in Education** (10th Edition) Published by PHI Leaving Private Limited New Delhi- 110001*

*Copyright © 2018, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*